## Reading Comprehension: (Any one)

### सहल

सहल निघाली बागेत. मुले चालली रांगेत. चंदू उडवी पतंग.
लाल-तांबडा सुंदर रंग. लगडी, खोखो सुरु झाले.
खाऊ खायला सगळी मुले बसली. सहल अशी ही खूप रंगली.

१) सहल कुठे निघाली?
२) मुले कशी चालली?
३) चंदू काय उडवत होता?
४) मुले काय खायला बसली?
५) तुम्ही सहलीला गेला आहेत का? कुठे?

### टेकडीवरील देऊळ

ती पाहा टेकडी. टेकडीजवळ ओढा आहे.
टेकडीवर एक देऊळ आहे. देऊळ रामाचे आहे.
देऊळ छान आहे. देवळाला जायला वाट आहे.
वाट वाकडीतिकडी आहे.
सकाळची वेळ, छान गार हवा.

१) टेकडीजवळ काय आहे?
२) देऊळ कशावर आहे?
३) देऊळ कोणाचे आहे?
४) वाट कशी आहे?
५) सकाळच्या वेळी काय छान आहे?



Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Comprehension: ( Any one)

## माझी बाग!

बागेत कोण कोण येते बरं कोण कोण येते?
चिमणी येते नि कावळा येतो, इकडे तिकडे उडून जातो.
मैना येते नि पोपट येतो, पेरू, डाळिंब खाऊन जातो.
मोर येतो आणि लांडोर येते, आंब्याच्या डहाळीवर झुलून जाते.
कोकीळ येते आणि बुलबुल येतो, गोड गोड गाणी गाऊन जातो.

१) कोणता पक्षी इकडे तिकडे उडून जातो?
२) पोपट काय खाऊन जातो?
३) आंब्याच्या डहाळीवर कोण झुलून जाते?
४) गोड गोड गाणी कोण गाऊन जातो?
५) तुमचे आवडते पक्षी कोणते?

## घरी आले पाहुणे

विनूच्या घरी आले त्याचे काका-काकी आणि मामा- मामी.
तो म्हणाला काका घर बघ. मामा घर बघ.
त्याने काकीला विचारले इरा आली का? ती म्हणाली, "हो विनू, ती आली".
त्याने मामीला विचारले रीमा आली का? मामी म्हणाली, "नाही, ती तिच्या आत्याकडे गेली".
मग विनू आणि इरा खेळायला गेले.

१) विनूच्या घरी कोण आले?
२) विनू काका आणि मामला काय म्हणाला?
३) त्याने काकीला काय विचारले?
४) रीमा कुठे गेली?
५) विनू आणि इराने काय केला?



Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.